अहमदनगर महानगरपालिका
वैद्यकीय आरोग्य विभाग जा.क्र. २०९
दिनांक :-२८/०४ /२०२१

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर
वैद्यकीत आरोग्य विभागाकडील कोव्हीड केअर सेंटर करीता
मानधनावर (तात्पुरत्या) स्वरुपात भरती

अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोव्हीड केअर सेंटर ही चालु करण्यात आलेले आहे.त्याकरीता कोव्हीड केअर सेंटर येथे तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने एकत्रित मानधन तत्वावर तीन महिन्या करीता नियुक्तीसाठी अर्हता धारक पात्र उमेदवारांच्या थेट पध्दतीने नुसार मुलाखती आयोजीत करण्यात येत आहे. तरी पात्र शैक्षणिक प्रमाणपत्राच्या छायांकीत प्रति जोडून अर्जासह दि- २७/०४ /२०२१ रोजी थेट मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

१) अर्ज स्विकारण्याचे ठिकाण- मा.आयुक्त कार्यालय, अहमदनगर महानगरपालिका मुख्य कार्यालय, औरंगाबाद रोड, अहमदनगर. सकाळी- १० :०० ते दुपारी १२ : ००वा.
२) अर्ज छाननी वेळ - सकाळी- १२ ते दुपारी २ वा.
३) मुलाखतीमधील पात्र उमेदवारांची यादी- दुपारी ३ :०० वा.
४) थेट पध्दतीने मुलाखतीची वेळ- दुपारी ४:०० वा.
५) मुलाखतीचे ठिकाण- मा.आयुक्त कार्यालय, अहमदनगर महानगरपालिका मुख्य कार्यालय, औरंगाबाद रोड, अहमदनगर.

| अ.क्र. | पदाचे नाव | एकुण पद संख्या | शैक्षणिक पात्रता | मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | डॉक्टर | ०५ | एम.डी. | ७५०००/- |
| २ | डॉक्टर | १० | एमबीबीएस | ६०,०००/- |
| ३ | डॉक्टर | २० | बीएएमएस/बीएचएमएस | ३०,०००/- |
| ४ | सिस्टर स्टाफ (नर्स) | २५ | जीएनएम /एएनएम | २०,०००/- |
| ५ | लॅब टेक्नीशियन | १५ | बीएससी पदवी व डिएमएलटी कोर्स उत्तीर्ण | १७,०००/- |
| | फार्मासिस्ट | १५ | डि- फार्मसी/बी-फार्मसी | १७,०००/- |

अटी व शर्ती :-

१) निवड झालेल्या उमेदवारांना कंत्राटी कराबध्द पध्दतीने नेमणुकीचा कालावधी नेमणुक सर्व साधारण पणे ०३ महिने राहिल.
२) अर्जासोबत- १) वयाचा पुरावा २) पदवी / पदवीका प्रमाणपत्र ३) शेवटच्या वर्षाची गुणपत्रीका ४) कौन्सील रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र ५) शासकीय / निमशासकीय संस्थेमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र ६) मुलाखतीच्या अनुषंगाने इतर कागदपत्र मुळ व सत्यप्रत साक्षांकीत प्रत इत्यादी सादर करणे आवश्यक राहील.
३) निवड झालेल्या उमेदवारांनी नियुक्तीसाठी अटी व शर्ती संबंधीतांवर बंधनकारक असुन नियुक्त झालेल्या उमेदवारांनी रुजु होते वेळी सदरच्या अटी-शर्ती मान्य असल्याबाबत रुपये १००/- च्या मुंद्रांकावर मा.जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर अथवा त्यांनी अधिकार प्रदान केलेले अधिकारी यांचे समोर साक्षांकीत करुन देणे बंधनकारक राहील.

उपायुक्त (कर)
अहमदनगर महानगरपालिका

प्रत :-प्रसिध्दी विभाग प्रमुख वरील प्रमाणे भरती जाहिरात एक जिल्हास्तरीय व एक स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करावा.
प्रत :-संगणक विभाग प्रमुख वरील प्रमाणे भरती जाहिरात मनपा वेबसाईटवर प्रसिध्द करावा.